# ई-ग्रंथालय उपयुक्त : आनंद

## राजा राममोहनराय फाउंडेशनतर्फे म्हापशात कृतिसत्र

संजय घुग्रेटकर

पणजी, ता. १४ : आजच्या गतिमान माहिती तंत्रज्ञानाच्या युगात योग्य माहिती, योग्य व्यक्तींपर्यंत पोचविण्याची मोठी जबाबदारी ग्रंथपालावर आहे. त्यासाठी ग्रंथालये समृद्ध असणे, ही आजची गरज आहे. वाचकाला चांगली सेवा देण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे आवश्यक असून ग्रंथालयात 'ई- ग्रंथालय'सारखे सॉफ्टवेअर वापरणे गरजेचे आहे, अशी माहिती जे. जे. आर. आनंद यांनी दिली.

म्हापसा नगरपालिका ग्रंथालय आणि राजा राममोहनराय फाउंडेशनतर्फे म्हापसा येथे आज (ता.१४) आयोजित 'ई-ग्रंथालय' कृतिसत्राच्या उद्‍घाटनाप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर उपनगराध्यक्ष ऑस्कर डिसोझा, राष्ट्रीय माहितीतंत्र केंद्राचे रामकुमार मतोरिया, ग्रंथपाल ज्ञानेश्वर पार्सेकर, अधिकारी राजू गावस, नगरसेविका कॅरोल कारास्को, राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे क्युरेटर कार्लोस फर्नांडिस, के. व्ही. रामनाथन होते.



रामकुमार मतोरिया

श्री. आनंद पुढे म्हणाले, की गोव्यात इंटरनेटची चांगली सुविधा आहे. ब्रॉडबँड सुविधा उपलब्ध असून बहुसंख्य ग्रंथालयात संगणकसुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे 'ई-ग्रंथालय' सॉफ्टवेअरचा वापर चांगल्या प्रकारे होऊ शकतो. शिवाय हे सॉफ्टवेअर मोफत दिले जाते. या सॉफ्टवेअरचा लाभ घेऊन ग्रंथालयीन सेवा सुधारावी, असे आवाहनही त्यांनी केले.

वाचकांना हवे असलेले कोणतेही पुस्तक वाचता यावे किंवा संदर्भ सहज उपलब्ध व्हावा. सेवा आणि गुणात्मकतेत गतिमानता यावी, यासाठी ग्रंथालये ई-सुविधेने जोडली जाणे आवश्यक आहे. ई-ग्रंथालय ही पथदर्शी योजना असून याचा लाभ प्रत्येक ग्रंथालयाने घेतला पाहिजे. त्यासाठी ग्रंथपालांना संगणक साक्षर असणे आवश्यक आहे, असे मत मतोरिया यांनी व्यक्त केले.

म्हापसा पालिका ग्रंथालयात उत्कृष्ट सेवेसाठी फाउंडेशनतर्फे ग्रंथपाल ज्ञानेश्वर पार्सेकर, कर्मचारी दिनकर आरोलकर, बसवराज मोरे यांचा गौरव करण्यात आला. सहभागी ग्रंथपालांना श्री. रामकुमार यांच्या हस्ते 'ई-ग्रंथालय' सॉफ्टवेअरची प्रत भेट देण्यात आली. सूत्रसंचालन उदय म्हाडेश्री यांनी केले. आभार ज्ञानेश्वर पार्सेकर यांनी मानले.

गोल्डन लक्ष्मी ... निकाल दि.